**महाराष्ट्र शासन**

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), महाराष्ट्र राज्य,**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४००२२**

Website : www.vanarti.in CIN: U84120MH2026NPL466492 ईमेल– : vanarti.info@gmail.com


जा.क्र. वनार्टी/नागपूर/आस्था/861/2026-27 दि. 01/09/2026

## -: परिपत्रक :-

**विषय :- वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) मार्फत राबविण्यात येणाऱ्या "वनार्टी सेवादूत प्रकल्प" अंतर्गत वनार्टी सेवादूत पदाकरीता ऑनलाईन तसेच ऑफलाईन अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत.**

वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) ही विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJ-NT) प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, संशोधन व प्रशिक्षणविषयक प्रगतीसाठी कार्यरत असलेली संस्था आहे. महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये शासनाच्या विविध योजना, सामाजिक उपक्रम, शैक्षणिक व रोजगारविषयक संधी तसेच संबंधित संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती समाजातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे, योजनांचा प्रचार व प्रसार करणे, पात्र लाभार्थ्यांचे मार्गदर्शन करणे, क्षेत्रीय स्तरावर माहिती संकलित करणे व जनजागृती करणे या उद्देशाने **"वनार्टी सेवादूत प्रकल्प"** राबविण्यात येत आहे.

सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील 36 जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी 01 पुरुष व 01 महिला, अशा एकूण 72 सेवादूतांची नियुक्ती करण्यात येत आहे. "वनार्टी सेवादूत प्रकल्प" अंतर्गत सेवादूत पदासाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन तसेच ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतीने अर्ज दि. 30/08/2026 रोजी पर्यंत मागविण्यात आलेले होते.

सदर पदाकरीता ऑनलाईन तसेच ऑफलाईन अर्ज करण्यासाठी **दि. 15/09/2026 रोजी** पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज विहित मुदतीत सादर करावेत.

इतर सर्व अटी व शर्ती पूर्वीच्या परिपत्रकानुसार कायम राहतील. सर्व संबंधीतांनी याची नोंद घ्यावी.

**स्वा.**

**(प्रशांत वावगे)**

**व्यवस्थापकीय संचालक (प्र.)**

वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी)